नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १५६ | किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com

AROTE Dental Clinic
smile more..live more..

डॉ. सौ. स्वप्नाली अतुल आरोटे (तांबे)
B.D.S. (Dental Surgeon)
Reg.No.: A-17501
दंतरोग तज्ञ
वेळ : सकाळी १० ते दुपारी १ व संध्याकाळी ५ ते ८
उपलब्ध उपचार
* रुट कॅनॉल ट्रीटमेंट
* हिरड्यांवरील उपचार व शस्त्रक्रिया
* वेडेवाकडे दात सरळ करण्याचे उपचार
* दात व जबड्यांवरील शस्त्रक्रिया
* कृत्रिम दंतरोपण शस्त्रक्रिया
* लहान मुलांच्या दातांवरील उपचार
पत्ता : ओम शांती बिल्डिंग, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि.अ.नगर
फोन : (०२४२४)२२२३४३

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
# समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5
Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net

शनिवार, दि. ०९ मे २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### पोलिस महा संचालकांची समिती

मुंबई (स. गांवकरी) : कोणत्याही पुराव्याशिवाय समाज माध्यमांवर बदनामी करण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असून या प्रकाराला कायद्याने आळा घालता यावा, याकरिता पोलिस महासंचालकांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे. बदनामीकारक मजकूर, खोट्या बातम्या, अश्लील किंवा धमकी देणाऱ्या पोस्टमधून कुणाचीही प्रतिमा मलीन केली जाते. समाजमाध्यमांवरील अशा बदनामीसंदर्भात अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्रश्न उपस्थित झाले असता, त्यांना उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस समितीची घोषणा केली होती. त्यानुसार गृह विभागाने ही समिती स्थापण्याचा निर्णय घेतला आहे. यात पोलीस महासंचालकांसह विधी व न्याय, महिती व तंत्रज्ञान, महिला वा बाल विकास विभागाचे प्रधान सचिव, सायबरचे अपर पोलीस महासंचालक यांचा समावेश असेल. समिती आवश्यक असल्यास आयटीतील तज्ज्ञांशी सल्लामसलत करेल.

### मुंबईत उन्हाची काहिली वाढली

मुंबई (स. गांवकरी) : मागील दोन दिवसांपासून मुंबईत उष्ण आणि दमट वातावरण आहे. यामुळे दुपारी नागरिकांना उन्हाचे चटके सहन करावे लागत आहेत. तसेच मागील काही दिवसांपासून आर्द्रतेच्या प्रमाणातही वाढ झाल्याने घामाच्या धारांचा सामना नागरिकांना करावा लागत आहे. शहरात शुक्रवारी ३५.५ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. दरम्यान, मुंबईसह, पालघर आणि ठाणे जिल्ह्यात शनिवारी आणि रविवारीही उष्ण आणि दमट वातावरण असण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. यामुळे नागरिकांना उन्हाचा तडाखा सहन करावा लागणार आहे. मुंबई महानगर प्रदेशात गुरुवारी काही ठिकाणी धुळीच्या वादळासह पावसानेही हजेरी लावली. यादरम्यान, मुंबई शहर आणि उपनगरांतही पावसाची शक्यता खासगी हवामान अभ्यासक आणि हवामान संस्थेकडून वर्तविण्यात आली होती. मागील काही दिवसांपासून शहरात उष्ण आणि दमट वातावरण असल्याने नागरिकांच्या समस्येत अधिकच भर पडली असून यामुळे अनेकांना आरोग्यविषयक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

### एनसीएमसी कार्ड बंधनकारक

मुंबई (स. गांवकरी) : राज्य परिवहन (एसटी) महामंडळाने सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी महत्त्वाचा निर्णय घेतला असून, मोफत प्रवास पास सुविधेसाठी जुलै २०२६ पासून राष्ट्रीय सामान्य गतिशीलता कार्ड (एनसीएमसी) बंधनकारक करण्यात आले आहे. एसटी महामंडळाच्या परिपत्रकानुसार, एप्रिल २०२६ पासून सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना वर्षभरासाठी मोफत प्रवास पास मंजूर करण्यात आला आहे. या पासधारकांना साध्या बसमध्ये मोफत प्रवास करता येणार असून, इतर श्रेणीतील बसमध्ये प्रवास करताना भाड्यातील फरक भरून प्रवास करण्याची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. जुलै २०२६ पासून मोफत प्रवास पासाचा लाभ घेण्यासाठी सशुल्क 'रुपे ऑन द गो' सक्षम एनसीएमसी कार्ड घेणे आवश्यक आहे. हे कार्ड ईबिक्स टेक्नॉलॉजी लिमिटेडमार्फत वितरित करण्यात येणार असून, एसटीच्या २५१ आगारांमध्ये, ३३५ वाहतूक नियंत्रण कक्षांमध्ये तसेच एनएसडीएल पेमेंट बँकेच्या अधिकृत एजंटमार्फत कार्ड नोंदणी व वितरण होणार आहे. सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना कार्ड मिळविण्यासाठी विहित नमुन्यात अर्ज सादर करावा लागणार आहे.

# विजय यांच्या शपथविधीबाबत संभ्रम

## 'टीव्हीके'ने राज्यपालांना सादर केले फक्त ११६ स्वाक्षऱ्यांचे पत्र!



**मुंबई : (स. गांवकरी)**

तामिळनाडू विधानसभा निवडणूक निकालानंतर राज्यात त्रिशंकू परिस्थिती निर्माण झाल्याचे पाहायला मिळत आहे. निवडणुकीत टीव्हीके सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर आला असला तरी पक्षाकडे बहुमत नसल्याने त्यांच्या सत्तास्थापनेत अडथळे येत आहेत. दरम्यान तमिळनाडूमध्ये सध्या सुरू असलेल्या या राजकीय नाट्यात शुक्रवारी रात्री उशिरा एक नवीन वळण आल्याचे पाहायला मिळाले. टीव्हीके प्रमुख विजय शनिवारी मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतील असे वाटत होते, मात्र अगदी शेवटच्या क्षणी आवश्यक असलेल्या पाठिंब्याच्या पत्राबाबत अनिश्चितता निर्माण झाल्याने राज्यपालांना शपथविधीची अधिकृत घोषणा पुढे ढकलावी लागली आहे. लोकभवनामधील सूत्रांच्या हवाल्याने इंडिया टुडे टीव्हीने वृत्त दिले आहे की, राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ आर्लेकर हे अद्याप 'व्हीसीके'कडून पाठिंब्याच्या अधिकृत पत्राची प्रतीक्षेत आहेत. दरम्यान, विजय यांनी शुक्रवारी संध्याकाळी राज्यपालांची भेट घेऊन ११६ आमदारांच्या स्वाक्षऱ्यांचे पत्र सादर केले. मात्र बहुमतासाठी ११८ आमदारांचा पाठिंबा असणे अवश्यक आहे.

सीपीआय, सीपीआय (एम) या डीएमकेच्या मित्रपक्षांनी शुक्रवारी टीव्हीकेला पाठिंबा दिल्याने विजय यांचा पक्ष बहुमताच्या उंबरठ्यावर येऊन ठेपला आहे. यातच व्हीसीके आणि इंडियन युनियन मुस्लिम लीग (IUML) यांनी टीव्हीकेला पाठिंबा दिल्याचे वृत्त समोर आल्यानंतर, विजय शनिवारी सकाळी ११ वाजता शपथ घेणार असल्याचे निश्चित मानले जात होते. या पाठिंब्यामुळे आघाडीकडे एकूण १२० आमदारांचे संख्याबळ झाले होते.

मात्र यामध्ये देखील मोठी उलटफेर पाहायला मिळाला, ज्या इंडियन युनियन मुस्लिम लीगने टीव्हीकेला बिनशर्त पाठिंबा दिल्याचे वृत्त समोर आले होते. त्यांनी आता विजय यांच्या नेतृत्वाखालील पक्षाला पाठिंबा देण्यास नकार दिला आहे. आपण डीएमके आघाडीबरोबरच राहणार असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले आहे.

तसेच सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, टीव्हीकेचे नेते व्हीसीकेचे प्रमुख थोल थिरुमावलवन यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करत आहेत, मात्र त्यांच्याशी संपर्क होत नसल्याचे सांगितले जात आहे. लोकभवनामधील सूत्रांनी सूचित केले आहे की, व्हीसीकेकडून औपचारिक पाठिंब्याचे पत्र मिळाल्यानंतरच राज्यपाल कार्यालय शपथविधी सोहळ्याची घोषणा करण्याची शक्यता आहे. विजय यांनी आज संध्याकाळी तमिळनाडूंच्या राज्यपालांची पुन्हा एकदा भेट घेतली. गेल्या तीन दिवसांत घेतलेली ही त्यांची तिसरी भेट होती. यापूर्वीच्या दोन भेटींमध्ये त्यांना बहुमताचा पुरावा सादर करण्यास सांगण्यात आले होते. काँग्रेस, सीपीआय आणि सीपीआयएम यांनी पाठिंबा दिल्याने, २३४ सदस्यांच्या विधानसभेत टीव्हीके बहुमताच्या ११८ या आकड्याच्या जवळ पोहेचला आहे.

### जोसेफ विजय यांचा शानदार विजय

विजय यांच्या नेतृत्वाखालील टीव्हीकेने विधानसभा निवडणुकीत दमदार कामगिरी करत १०८ जागा जिंकल्या, पण २३४ सदस्यांच्या सभागृहात पक्ष बहुमताच्या आकड्यापेक्षा थोडा मागे राहिला. यामध्ये विजयने स्वतः निवडणूक लढवलेल्या दोन्ही जागांवर विजय मिळवला असून, निवडणूक आयोगाच्या नियमानुसार त्यांना यापैकी एक मतदारसंघ सोडावा लागणार आहे. तमिळनाडू विधानसभा निवडणुकीत टीव्हीके सर्वात मोठा पक्ष म्हणून समोर आला आहे. या विजयामुळे डीएमके आणि एआयएडीएमके या पक्षांचे अनेक दशकांपासून असलेले वर्चस्व मोडीत निघाले आहे. या निवडणुकीत डीएमकेला ५९, तर एआयएडीएमकेला ४७ जागांवर समाधान मानावे लागले आहे.

# कृत्रिमरीत्या पिकवलेल्या फळांवर पणन विभागाची करडी नजर

## बाजार समित्यांना भेसळ रोखण्याच्या सूचना

**नवी मुंबई : (स. गांवकरी)**



वाशीतील मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती (एपीएमसी) बाजारात आंबे कृत्रिमरीत्या पिकवण्यासाठी रसायनांचा वापर होत असल्याचा प्रकार समोर आल्यानंतर पणन विभागाने राज्यातील सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्या, खाजगी बाजार आणि थेट पणन परवानाधारकांना शेतमालातील भेसळ व रासायनिक प्रक्रिया रोखण्यासाठी सूचना जारी केल्या आहेत. फळे, भाजीपाला आणि अन्नधान्य यामध्ये घातक रसायनांचा वापर होत असल्याचा संशय आल्यास तातडीने तपासणी करून आवश्यक कारवाई करण्याचे निर्देश पणन विभागातर्फे देण्यात आले आहेत. वाशीतील मुंबई एपीएमसी फळ बाजारात अलीकडेच एपीएमसी प्रशासन आणि अन्न व औषध प्रशासनाने संयुक्त कारवाई करून संशयित आंब्यांचे नमुने जप्त केले होते. बाजारात वाढती मागणी लक्षात घेऊन काही व्यापाऱ्यांकडून कच्चे आंबे कमी वेळात पिकवण्यासाठी रसायनांचा वापर होत असल्याचे निदर्शनास आले होते. या पार्श्वभूमीवर पणन संचालनालयाने शुक्रवार, ८ मे रोजी राज्यभरातील बाजार समित्यांना परिपत्रकाद्वारे निर्देश दिले आहेत. परिपत्रकानुसार, बाजार समित्यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील व्यापाऱ्यांची वेळोवेळी काटेकोर तपासणी करावी. फळे कृत्रिमरीत्या पिकवण्यासाठी रसायनांचा वापर, फळे-भाजीपाल्याला कृत्रिम रंग देणे किंवा शेतमाल अधिक काळ टिकवण्यासाठी घातक रसायनांचा वापर होत असल्यास तत्काळ उपाययोजना करण्यास सांगण्यात आले आहे. संशयित शेतमालाचे नमुने अन्न व औषध प्रशासन विभागाकडे तपासणीसाठी पाठवून दोषी आढळणाऱ्यांविरोधात अन्न सुरक्षा आणि मानके कायदा, २००६ अंतर्गत कारवाई प्रस्तावित करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत. भेसळ करणाऱ्या परवानाधारक व्यापाऱ्यांचे परवाने रद्द करण्याबरोबरच त्यांना उपलब्ध करून दिलेल्या सुविधा तातडीने काढून घेण्याची कार्यवाही करण्याबाबतही परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे. महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ अंतर्गत बाजार समित्यांना शेतमाल व्यवहारांचे नियमन करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

# अविनाश पाठक यांना सात दिवसांची कोठडी

**छत्रपती संभाजीनगर : (स. गांवकरी)**



धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादनातील वाढीव मोबदल्याच्या १५४ प्रकरणांत २४१ कोटी ६२ लाख रुपयांच्या घोटाळ्यात तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना बीड पोलिसांनी न्यायालयासमोर उभे केल्यानंतर त्यांना सात दिवसांच्या पोलीस कोठडीचे आदेश जिल्हा न्यायालय क्र. २ च्या न्यायाधिश एस. आर. शिंदे यांनी दिले. या प्रकरणात ७२ कोटी रुपयांचा वाढीव मोबदला वाटप करून अपहार झाला होता. या प्रकरणी बीडच्या शिवाजी पोलीस ठाण्यात दाखल दहा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला होता. वाढीव मोबदल्यावरील आदेशातील अविनाश पाठक यांच्या स्वाक्षरीबाबतचे अहवाल तपासल्यानंतर त्यांना चौकशीसाठी लातूरहून ताब्यात घेण्यात आले. रात्री त्यांना अटक करण्यात आली. दुपारी चारच्या सुमारास पाठक यांना जिल्हा न्यायालयात आणल्यानंतर पोलिसांनी आवाजाचे नमुने घेण्यासाठी तसेच या प्रकरणातील काही संचिकांचा तपास करण्यासाठी आरोपी पाठक यांना दहा दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी केली. आरोपीकडून लॅपटॉप जप्त करणे, कॉल रेकॉर्डिंगसाठी आवाजाचे नमुने घ्यायचे आहे तसेच आरोपींची तीन ठिकाणी घरे आहेत. त्यातील लातूर ,पुणे आणि मुंबई या ठिकाणी झडती घ्यायची आहे असे पोलिसांच्या वतीने सांगण्यात आले.

# काँग्रेसचा 'डीएमके'शी काडीमोड हा राजकीय मूर्खपणा

## काँग्रेसच्या नेत्याची टीका, तर लोकसभेत डीएमकेची वेगळी चूल



**मुंबई : (स. गांवकरी)**

तमिळनाडूमधील राजकीय घडामोडींचे परिणाम राष्ट्रीय पातळीवर उमटू लागले आहेत. ४ मे रोजी निकाल लागलेल्या विधानसभा निवडणुकीत जोसेफ विजयच्या तमिळगा वेत्री कळघम पक्षाला सर्वाधिक १०८ जागा मिळाल्या असल्या तरी बहुमताच्या संख्येपासून ते दूर राहिले. यामुळे बहुमत गाठण्यासाठी काँग्रेसने विजयला पाठिंबा दिला. मात्र यामुळे इंडिया आघाडीत फूट पडली आहे. काँग्रेसने निवडणुकीआधी द्रमुकशी आघाडी करत निवडणूक लढवली होती. मात्र आता विजयला पाठिंबा देण्यासाठी काँग्रेसने द्रमुकशी असलेली ५० वर्षांपूर्वीची आघाडी मोडली आहे. द्रमुक पक्षासह आता काँग्रेसचे नेतेही यावर टीका करत आहेत. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मणीशंकर अय्यर यांनी द्रमुकशी असलेली आघाडी मोडल्यानंतर स्वतःच्या पक्षावर टीका केली आहे. विजयच्या पक्षाशी युती केल्यामुळे काँग्रेसने महात्मा गांधींचे नैतिकतेचे सरकार स्थापन करण्याच्या आज्ञेचे उल्लंघन केले आहे. मणीशंकर अय्यर म्हणाले, "१०० वर्षांपूर्वी नोव्हेंबर १९२५ मध्ये महात्मा गांधी यांनी 'नवजीवन' या गुजराती मासिकातून असा संदेश दिला होता की, स्वराज्य म्हणजे नैतिकतेवर आधारित सरकार असायला हवे. काँग्रेसने मागच्या निवडणुकीत टीव्हीके पक्षाचा विरोध केला होता. त्यानंतर आता स्वतःहूनच काँग्रेस पक्ष सत्तेच्या जहाजात जाऊन बसला आहे. हा महात्मा गांधींच्या काँग्रेस पक्षाने त्यांनीच दिलेल्या विचाराला फाटा दिला आहे. अशाप्रकारचे राजकारण फार काळ टिकत नाही." २०२६ च्या विधानसभा निवडणुकीत जोसेफ विजय यांच्या टीव्हीके पक्षाने २३४ पैकी तब्बल १०८ जागा जिंकून जोरदार मुसंडी मारली. तर काँग्रेस, द्रमुक यांच्या आघाडीला या निवडणुकीत पराभवाचा सामना करावा लागला.

### हा तर राजकीय मूर्खपणा

मणीशंकर अय्यर हे त्यांच्या वादग्रस्त विधानांसाठी ओळखले जातात. स्वा. सावरकर यांच्याबाबत केलेल्या विधानानंतर शिवसेनेचे संस्थापक नेते, दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांनी अय्यर यांच्या पुतळ्याला जोडे मारो आंदोलन केले होते. यावेळी अय्यर यांनी स्वतःच्या काँग्रेस पक्षालाच लक्ष्य केले आहे.

# सुवेंदू अधिकारी असणार बंगालचे नवे मुख्यमंत्री

**मुंबई : (स. गांवकरी)**



पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांना दोन वेळा निवडणुकीत पराभूत करणारे सुवेंदू अधिकारी हेच आता नवे मुख्यमंत्री होणार आहेत. पश्चिम बंगाल भाजपाने याची घोषणा शुक्रवारी केली. पश्चिम बंगालच्या सत्ता स्थापनेचा विषय मार्गी लावण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज कोलकाता येथे आले होते. त्यांच्या उपस्थितीत सुवेंदू अधिकारी यांची भाजपाच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड करण्यात आली. कोलकाता येथील बिस्वा बांगला कन्व्हेन्शन सेंटरमध्ये भाजपाच्या पश्चिम बंगाल कार्यकारिणी आणि नवनिर्वाचित आमदारांची बैठक पार पडली. या बैठकीला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि प्रदेशाध्यक्ष शमिक भट्टाचार्य उपस्थित होते. या बैठकीत सुवेंदू अधिकारी यांची विधिमंडळ पक्षनेतेपदी एकमताने निवड करण्यात आली.

या बैठकीत बोलत असताना केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले, निवडणुका संपल्या असून पक्षाने मोठा विजय मिळवला आहे. आता सर्वांनी एकच नाव पुढे केले आहे. दुसरे नाव निवडण्यासाठी नेत्यांना वेळ देण्यात आली, मात्र दुसऱ्या कुणाचेही नाव पुढे आले नाही. यामुळे आता सुवेंदू अधिकारी हेच पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री असतील यावर शिक्कामोर्तब झाले आहे. ५५ वर्षीय सुवेंदू अधिकारी यांनी २०२१ साली नंदीग्राम विधानसभा मतदारसंघातून ममता बॅनर्जी यांचा पराभव केला होता. त्यानंतर पाच वर्ष त्यांनी विधानसभेचे विरोधी पक्षनेते म्हणून काम केले. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी पुन्हा एकदा भवानीपूर विधानसभा मतदारसंघातून ममता बॅनर्जी यांचा तब्बल १५ हजार मतांनी दणदणीत पराभव केला. सुवेंदू अधिकारी यांना एक प्रतिष्ठिती राजकीय कौटुंबिक पार्श्वभूमी आहे. सुवेंदू यांचे वडील शिशिर अधिकारी यांनी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखालील युपीए-२ सरकारमध्ये केंद्रीय मंत्री म्हणून काम पाहिले होते. शिशिर यांना सुवेंदू, दिब्येंदू आणि सौमेंदू अशी तीन मुले आहेत. तिघेही राजकारणात सक्रिय आहेत.

सुवेंदू अधिकारी यांनी काँग्रेसच्या विद्यार्थी संघटनेपासून राजकीय जीवनाचा प्रवास सुरू केला. सुवेंदू अधिकारी जेव्हा राजकारणात आले तेव्हा बंगालमध्ये डाव्यांची सत्ता होती. १९९५ साली सुवेंदू अधिकारी पहिल्यांदा नगरसेवक म्हणून निवडून आले. १९९८ साली जेव्हा ममता बॅनर्जी यांनी तृणमूल काँग्रेसची स्थापना केली, तेव्हा सुवेंदू अधिकारी या पक्षात आले. २००६ मध्ये ते कांथी दक्षिण मतदारसंघातून आमदार झाले. एका वर्षानंतर, ममता बॅनर्जी यांच्या नंदीग्राम आणि सिंगूरमधील जमीन अधिग्रहण विरोधी आंदोलनादरम्यान त्यांना मुख्य संघटक बनवण्यात आले. अधिकारी यांनी 'भूमी उच्छेद प्रतिरोध समिती'चे नेतृत्व करत नंदीग्राममधील आंदोलनाचे सारथ्य केले. या आंदोलनाने बंगालमधील डाव्या आघाडीची ३४ वर्षांची सत्ता संपुष्टात आणली आणि २०११ मध्ये ममता बॅनर्जी मुख्यमंत्री बनल्या.

### राज्यपालांकडून विधानसभा विसर्जित

विधानसभा निवडणुकीत पराभवाचा धक्का बसल्यानंतर तृणमूल काँग्रेसच्या सर्वेसर्वा ममता बॅनर्जी यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देण्यास नकार दिला होता. निवडणूक निकाल हे जनमताचे प्रत्यंतर नसून, ते निवडणूक आयोगाने भाजपच्या साथीने रचलेले षड्यंत्र असल्याचा आरोप ममतांनी केला होता. अखेर बुधवारी पश्चिम बंगालचे राज्यपाल आर. एन. रवी यांनी विधानसभा विसर्जित केली. त्यानंतर पश्चिम बंगालमधील तृणमूल काँग्रेसच्या सरकार अधिकृतपणे संपुष्टात आले.

# अकरावी प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर; ७ लाखांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी केली नोंदणी

**मुंबई : (स. गांवकरी)**




इयत्ता दहावीचा निकाल जाहीर होताच शिक्षण संचालनालयाने अकरावी प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर केले. त्यानुसार विद्यार्थ्यांना अकरावी प्रवेशाच्या अर्जाचा दुसरा भाग ११ मेपासून विद्यार्थ्यांना भरता येणार आहे. तर प्रवेशाची तात्पुरती गुणवत्तायादी १५ मे रोजी, तर पहिली गुणवत्तायादी २६ मे रोजी जाहीर करण्यात येणार आहे. गतवर्षीपासून अकरावी प्रवेश प्रक्रिया संपूर्ण राज्यामध्ये ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना अर्ज भरण्यास अडचण येऊ नये यासाठी शिक्षण संचालनालयाने १० एप्रिलपासून अर्जाचा भाग १ भरण्यास सुरुवात केली आहे. त्यानुसार ८ मेपर्यंत ७ लाख ७४ हजार ९१८ विद्यार्थांनी प्रवेश अर्जाचा भाग १ भरून नोंदणी केली आहे. दहावी परीक्षेचा निकाल जाहीर होताच शिक्षण संचालनालयाने अकरावी प्रवेशाचे वेळापत्रक जाहीर केले आहे. या प्रक्रियेमध्ये तीन नियमित फेऱ्या, ओपन टू ऑल चौथी फेरी, मुलींकरिता विशेष पाचवी फेरी राबविण्यात येणार आहे. प्रवेश प्रक्रियेचे जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार ८ ते १० मे या कालावधीत विद्यार्थी नोंदणी व अर्जाचा भाग १ ऑनलाइन सादर करता येईल. ११ ते २० मेदरम्यान शून्य फेरी राबविण्यात येणार आहे. व्यवस्थापन, इन- हाऊस, अल्पसंख्याक कोट्यासाठी ११ ते १३ मेदरम्यान विद्यार्थ्यांना शून्य फेरीसाठी अर्जाचा भाग २ भरता येणार आहे. १५ मे रोजी तात्पुरती गुणवत्तायादी जाहीर करण्यात येईल. या गुणवत्तायादीवर १६ मे रोजी विद्यार्थ्यांना हरकती सादर करता येणार आहेत. १८ मे रोजी सर्वसाधारण गुणवत्तायादी अंतिम करण्यात येणार आहे. तसेच शून्य फेरीसाठी जागांचे वाटप करण्यात येणार आहे. २० मे रोजी पहिल्या फेरीसाठी कोट्यांच्या जागांसह रिक्त जागांचा तपशील जाहीर करण्यात येणार आहे. पहिल्या फेरीला २१ मेपासून सुरुवात होणार असून, २१ ते २२ मेदरम्यान विद्यार्थ्यांना अर्जाच्या भाग १ मध्ये बदल करणे, भाग २ भरता येणार आहे. त्यानंतर २६ मे रोजी पहिली फेरी जाहीर करण्यात येईल. या फेरीत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थांना २६ ते २८ मे या कालावधीत महाविद्यालयात जाऊन प्रवेश घ्यावा लागणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### ओपन जिमची उभारणी करूनच पुण्यातिधी साजरी

नायगाव (स. गांवकरी) : नायगाव तालुक्यातील बरबडा सर्कल असलेल्या टाकळी येथील रावसाहेब पाटील मोरे यांच्या पुण्यतिथी निमित्त नायगाव येथील जय राज पॅलेश येथे दि. ७ मे रोजी रावसाहेब पाटील मोरे यांच्या पुण्यतिथी दिनाचे औचित्य साधून. समाजासाठी काहीतरी देणे लागतो या भावनेतून सुस्ज अशी ओपन जीमची उभारणी केली आहे. सुमारे चार ते पाच लाख. रुपये खर्च करून उभारण्यात आलेले आहे ओप जीम मॉर्निंग वॉकसाठी आजच्या धकाधकीच्या जिवन शैलीत आरोग्याची काळजी घेण्यासाठी ही जिम निश्चितच कौतुकास्पद असुन मनोज पाटील मोरे यांनी समाजाच्या प्रति असलेली बांधिलकी कोतुकास्पद आहे. नायगाव मतदार संघातील नांदेड जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष कै. रावसाहेब पाटील मोरे टाकळीकर यांच्या पुण्यस्मरण दिनानिमित्ताने चहात्यांच्या वतीने रावसाहेब पाटील मोरे टाकळीकर यांच्या प्रति पुण्यस्मरण दिनानिमित्ताने विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते पुष्पांजली अर्पण करून आदरांजली अर्पण करण्यात आली . यावेळी खासदार रवींद्र पाटील चव्हाण. मा.मंत्री भास्करराव पाटील खतगावकर , माजी आमदार हनमंत पाटील बेटमोगरेकर.एज्युकेशन सोसायटीचे संचालक केशव पाटील चव्हाण. , जिल्हा अध्यक्ष भाजप संतुकराव हाबर्डे , बालाजी बच्चेवार , राजेश कुंटुरकर , नायगाव तालुका अध्यक्ष बालाजी मदेवाड , खरेदी विक्री संघाचे चेअरमन श्रीनिवास पाटील चव्हाण . मनोहर पवार , भास्कर पाटील भिलवंडे, संभाजी पाटील भिलवंडे, माधव धर्माधिकारी. मतदासंघांतील लोकप्रतिनिधी. विविध क्षेत्रातील मान्यवर . विविध पक्षाचे पदाधिकारी. कार्यकर्ते . सरपंच चेअरमन.आप्त. स्वकीय मित्रपरिवार . शेतकरी . कामगार.यांच्यासह गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### एस.एस.सी. 2026 बोर्ड परीक्षा निकालात चमकदार कामगिरी

मंचर (ता. आंबेगाव) (स. गांवकरी) : महात्मा गांधी विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, मंचर (भागशाळा चांडोली बु|| व वडगाव काशिंबेग) यांनी मार्च 2026 च्या एस.एस.सी. बोर्ड परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत 98.32% इतका उत्कृष्ट निकाल मिळवला आहे. या परीक्षेसाठी एकूण 359 विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी 353 विद्यार्थी यशस्वी ठरले. निकालामध्ये 126 विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य संपादन केले असून 130 विद्यार्थी प्रथम श्रेणीत, 73 विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर 24 विद्यार्थी पास श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये कु.आनंदराव लावण्या राहुल (485 गुण – 97%) हिने प्रथम क्रमांक मिळवला. कु.घिसे अमृता जयसिंग (481 गुण – 96.20%) हिने द्वितीय क्रमांक, कु.थोरात पूर्वा सुजित (480 गुण – 96.00%) हिने तृतीय क्रमांक, कु.चव्हाण प्रांजली परमेश्वर (479 गुण – 95.80%) हिने चतुर्थ क्रमांक तर कु.आनंदराव कार्तिकी संदीप (477 गुण – 95.40%) हिने पाचवा क्रमांक पटकावला. या यशाबद्दल प्राचार्य नितीन बाणखेले, उपमुख्याध्यापक महेंद्र कारंडे,पर्यवेक्षक दिलीप बच्चे,दशरथ काळे, वरिष्ठ लिपीक संदीप कोल्हे,भागशाळा वडगाव काशिंबेग विभागप्रमुख गोरक्षनाथ फुलसुंदर, भागशाळा चांडोली बु|| विभागप्रमुख सविता सोनवणे,लिपीक मंगल बुरुड,लिपीक सुप्रिया बेंडे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून गुणवंत विद्यार्थी तसेच मार्गदर्शक शिक्षकांचे विशेष कौतुक केले.विद्यालयाच्या या दैदिप्यमान यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



### ठाणे पालिकेतील ६४ सफाई कर्मचाऱ्यांचे वारस नोकरीत सामाविष्ठ

ठाणे (स. गांवकरी) : ठाणे महापालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना वारसातत्त्वावर महापालिकेच्या सेवेत सामावून घेण्याबाबत तसेच त्यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सूचना दिल्या होत्या. त्यानुसार महापौर शर्मिला पिंपळोलकर यांनी प्रशासनासोबत सातत्याने पाठपुरावा करून संबंधित प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश दिले होते. त्या अनुषंगाने सन मे 2024 ते ऑगस्ट 2024 या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या सफाई कर्मचाऱ्यांच्या 64 वारसांना महापालिकेच्या सेवेत सामावून घेण्यासाठी नियुक्तीपत्रे तयार करण्यात आली आहेत. यापैकी प्रतिनिधीक स्वरूपात 10 जणांना महापौर दालनात महापौर शर्मिला पिंपळोलकर यांच्या हस्ते नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली. सफाई कर्मचाऱ्यांचा वारसा हक्क आणि अन्य प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी महापौरांनी प्रशासनासोबत विशेष बैठक घेऊन आवश्यक सूचना दिल्या होत्या. त्यानुसार प्रशासनाने तातडीने कार्यवाही करत नियुक्ती प्रक्रिया पूर्ण केली. आज प्रातिनिधीक स्वरुपात 10 जणांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली असून उर्वरित जणांना प्रशासनामार्फत नियुक्तीपत्राचे वाटप करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे सेवानिवृत्त सफाई कर्मचाऱ्यांमध्ये तसेच त्यांच्या वारसांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, महापौर शर्मिला पिंपळोलकर, उपमहापौर कृष्णा पाटील, सभागृह नेते हणमंत जगदाळे, विरोधी पक्षनेते अशरफ शानू पठाण, शिवसेना गटनेते पवन कदम, महापालिका आयुक्त सौरभ राव तसेच प्रशासनातील अधिकाऱ्यांचे आभार व्यक्त केले.

### ठाण्यात व्यवसायाचे अमिष दाखवून दोघांचा महिलेवर अत्याचार

ठाणे (स. गांवकरी) : ठाण्यात रियल इस्टेटच्या व्यवसायाचे अमिष दाखवून महिलेवर अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. ठाण्यातील वैशाली नगर, भटवाडी भागात राहणारी महिला नवी मुंबई येथे खासजी कंपनीत नोकरी करत होते. घराला हातभर लागण्यासाठी छोटी मोठी रियल इस्टेटची कामे करत असे. आपल्या लोकमान्य नगर, ठाणे येथे राहण्यास असलेल्या मैत्रीणीने ओळख करून दिलेल्या दोघांनी अत्याचार केला असून राजू सावळकर, वय 40 वर्षे, रा. साकीनाका, मुंबई व त्याचा मित्र विनायक यांनी आमचे खूप बिझनेस आहेत तू खूप पैसे कमवशील तुला रियल इस्टेटचा बिझनेस देतो आमचे ठाण्यात खूप बिल्डराबरोबर ओळख असून तुला मोठी कामे मिळतील असे आश्वासन देऊन 03/05/2026 रोजी भेटले. विनायक व राजू यांनी आपली फोर्ड कंपनीची कार मध्ये घेउन भिवडी येथे गेल्यावर मोका पाहून दारू पिले त्यांनी जेवण केले. जेवताना विनायक म्हणाला की मी मोठा क्रिमीनल असून बेकायदेशीर दारू विक्री करण्याचा मोठा व्यवसाय आहे. आम्हाला त्या व्यवसायातून लाखो रूपये मिळतात.

## छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

# मान्यवरांच्या हस्ते शिबिरात विविध दाखले व प्रमाणपत्राचे वितरण

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

दि. ८ मे रोजी शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर" चे आयोजन तरोडा बु. मंडळातील पासदगाव येथे राधेश्वरी मंगल कार्यालयात करण्यात आले. या शिबिरास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध योजनांची माहिती घेऊन लाभ मिळविला.



सदर शिबिरास नांदेड उत्तर मतदारसंघाचे आमदार बालाजी कल्याणकर उपस्थित होते. तसेच जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, उपविभागीय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, तहसीलदार संजय वारकड, तालुका कृषी अधिकारी चातरमल, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रवीण मुंडे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मंडळातील विविध गावांचे सरपंच व इतर पदाधिकारीही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार बालाजी कल्याणकर यांनी शासनाच्या विविध योजना व उपक्रम नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी अशा शिबिरांची आवश्यकता असल्याचे सांगितले. महसुली कामे तात्काळ मार्गी लागत असल्यामुळे नागरिक समाधान व्यक्त करीत असून "शासन आपल्या दारी" ही संकल्पना प्रत्यक्षात साकार होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान" अंतर्गत महसूल, कृषी, आरोग्य, ग्रामविकास, महिला व बालकल्याण, विशेष सहाय्य, भूमी अभिलेख, नोंदणी व मुद्रांक, निवडणूक विभाग तसेच आपले सरकार सेवा केंद्र यांच्या विविध योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसीलदार संजय वारकड यांनी केले. त्यांनी शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती देत नागरिकांना योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

या शिबिरामध्ये सातबारा व 8-अ चे एकूण 748 दाखले वितरित करण्यात आले. तसेच उत्पन्न, रहिवासी, वय, जातीचे तसेच अल्पभूधारक प्रमाणपत्र आदी मिळून एकूण 799 प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत 6 लाभार्थ्यांना मंजुरी प्रमाणपत्र देण्यात आले.

एकात्मिक बाल विकास प्रकल्पांतर्गत लाभार्थ्यांना बेबी केअर किटचे वितरण करण्यात आले. तसेच सलोखा योजनेंतर्गत शेतकऱ्यांच्या गट अदलाबदलीद्वारे सातबाराचे वितरण करण्यात आले. कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत सन २०२५-२६ मध्ये ट्रॅक्टर खरेदीवर अनुदान प्राप्त झालेल्या लाभार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते मंजुरी पत्रांचे वितरण करण्यात आले.

याशिवाय SIR मोहिमेमध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या बीएलओंचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. शिबिरामध्ये विविध विभागांचे माहितीपर स्टॉल उभारण्यात आले होते. विशेषतः सातबारा व ८-अ वितरण, आधार दुरुस्ती, आपले सरकार सेवा केंद्र, जनगणनेतील स्व-गणना, आरोग्य तपासणी, वन विभाग, संजय गांधी निराधार योजना आदी स्टॉलना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. नागरिकांनी विविध योजनांची माहिती घेऊन तत्काळ अर्ज व नोंदणी प्रक्रिया पूर्ण केली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नायब तहसीलदार स्वप्नील दिगलवार, सुनील माचेवाड, गरड तसेच मंडळ अधिकारी शिवानंद स्वामी, अनिरुद्ध जोधळे, कुणाल जगताप, प्रमोद बडवणे, सय्यद मोसीन, संतोष आस्कुलकर, श्रीकृष्ण येलमट्टे यांच्यासह ग्राम महसूल अधिकारी गोपीनाथ कल्याणकर, मारोती कदम, संजय आढाव, अविनाश करंदीकर, माधव शिराळे तसेच तालुक्यातील सर्व ग्राम महसूल अधिकारी व महसूल सेवक यांनी परिश्रम घेतले.

## विठे माध्यमिक विद्यालयात वैष्णवी आरोटे प्रथम क्रमांकाची मानकरी

अकोले : (स. गांवकरी)

अकोले तालुक्यातील प्रवरा परिसरातील ह.भ.प. सावित्रीआई माध्यमिक विद्यालय, विठे येथील विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयातील कु. वैष्णवी हरीदास आरोटे हिने ८१.२० टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला. तर साहिल मदन भागवत याने ७८ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला. मयुर लक्ष्मण उघडे याने ७३.४० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला. याशिवाय सोहम योगेश आरोटे याने ७२.४० टक्के गुण मिळवत चौथा क्रमांक मिळविला असून अदिती किसन आरोटे हिने ७०.६० टक्के गुणांसह पाचवा क्रमांक पटकावला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे विद्यालयासह परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच अकोले कन्या विद्यालयातील सेमी इंग्रजी माध्यमाचा विद्यार्थी




कु. छत्रपती विश्वासराव आरोटे याने ७४.६० टक्के गुण प्राप्त केले. अगस्ती विद्यालयातील विद्यार्थी कु. आर्यन नवनाथ आरोटे याने ४५ टक्के गुण मिळवत यश संपादन केले. इयत्ता दहावी व बारावीमध्ये यश मिळविणाऱ्या गावातील सर्व गुणवंत, ज्ञानवंत व बुद्धिवंत विद्यार्थ्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. विद्यार्थ्यांच्या यशामागे पालक, शिक्षक व विद्यालयाचे मोलाचे मार्गदर्शन लाभल्याची भावना व्यक्त होत आहे. दरम्यान, शेतकरी व व्यावसायिक संध्या हरीदास आरोटे यांच्या कुटुंबाचेही सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

## बस सेवा नियमित करा : ग्रा.पं.ठरावाच्या माध्यमातून मागणी

बिलोली : (स. गांवकरी)

सगरोळी परिसरासह बिलोली व देगलुर तालुक्यातील प्रवाशांची मोठी गैरसोय लक्षात घेऊन बिलोली - सगरोळी मार्गे देगलूर तसेच नांदेड ते सगरोळी रात्री सगरोळी मुक्कामी आसणारी बंद झालेली बस सेवा नियमित करावी आशा मागणीचे निवेदन या परीसरातील नागरीकांनी ग्रामपंचायतीच्या ठरावाच्या माध्यमातुन बिलोली परिवहन महामंडळ आगार प्रमुखाकडे केली आहे. तेलंगणा व कर्नाटक राज्य सिमा भागातील बिलोली व देगलूर ही दोन्ही तालुके नागरीकांच्या अत्यंत महत्त्वाच्या दैनंदिन कामकाजा सोबतच विविध शासकीय कामासाठी तालुक्याच्या ठिकाणी नियमीत ये-जा करावी लागते. तसेच शेजारील तेलंगना व कर्नाटक राज्यात या भागातील नागरिकांच्या रोटी बेटीच्या नात्यागोत्यांचे मोठ्या प्रमाणात ऋणांनुबंध आसल्यामुळे या सिमा भागातुन ये-जा करणा-या प्रवाशांची सततची वर्दळ पहाता या



भागातुन महामंडळाला मिळणारे अर्थिक उत्पन्न पहाता तेलंगना राज्याच्या बसेस बोधन ते सगरोळी मार्गे देगलुर मोठ्या प्रमाणात धावताना दिसतात. तसेच या महामार्गावर मोठ्या प्रमाणात अवैध प्रवासी वहान चालक बेभाव प्रवासी भाडे वसुल करून प्रवाशांची अर्थिक लुटमार होत आसताना मात्र म.रा. परीवहन महामंडळाच्या बसेस या ६३ क्रमांकाच्यांच राष्ट्रीय महामार्गावरून वर्षे भरापासुन आचनक गायब का ? आसा सवाल प्रवाशी उपस्थित करीत आहेत.तर वयवृध्द प्रवाशाना शासनाच्या मोफत प्रवास, दिव्यांग व महिलांच्या पन्नास टक्के सवलतीचा उपयोग तरी काय? आसा संतप्तजनक सवाल उपस्थित होत आहे. तसेच सगरोळी हे मोठ्या वस्तीचे गाव आसुन येथे मोठी व्यापार पेठ आहे. तसेच सगरोळी व या भागातील खतगाव येथे मोठे शैक्षणिक संकुल आसुन येथे ये-जा करणा-यां हजारो शालेय विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे. या भागातील प्रवाशांची व शालेय विद्यार्थ्यांची एकंदरीत समस्या लक्षात घेऊन खतगाव,केसराळी, रामपूर थडी, हिप्परगा थडी,शिंपाळा यासह अन्य गावातील नागरिकांनी ग्रामपंचायतच्या ठरावाच्या माध्यमातून बिलोली ते सगरोळी - खतगाव- मार्गे देगलूर बस कायमस्वरुपी चालु करावी. तसेच नांदेड ते सगरोळी ही बस पुर्वी रात्रीला सगरोळी मुक्कामी थांबणारी बस खतगाव मार्गे नांदेड नियमीत करावी जेणे करून या भागातील गरजु रुग्णांना नांदेड येथील तज्ञ डॉक्टरांच्या उपचारासाठी अत्यंत उपयोगी आसुन तसेच जिल्हास्तरीय शासकीय व निमशासकीय कामकाजा बरोबर नागरीकांच्या इतर विविध समस्या लक्षात घेऊन या परिसरातील नागरिकांनी ग्रामपंचायतीच्या ठरावाच्या माध्यमातुन महत्वपुर्ण निर्णय घेऊन गेल्या वर्षेभरा पासुन विस्कळलेली ही बससेवा नियमीत करण्यासाठी ग्रा.पं.ने घेतलेल्या ठरावाच्या प्रती व निवेदन दि. ७ मे रोजी सामाजिक कार्यकर्ते राजु पाटील शिंपाळकर, विठ्ठलराव पा.काळे केसराळीकर, नागनाथ भुसावळे आदमपूरकर यांच्या स्वाक्षरीचे हे निवेदन बिलोली आगार प्रमुख नरसिंग निम्मनवाड याना देऊन ही विस्कळीत बस सेवा सुरळीत चालु करण्याची मागणी केली आहे.

## पथकाकडून कळस ग्रामपंचायतची तपासणी

अकोले : (स. गांवकरी)

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत सहभागी ग्रामपंचायतच्या तपासणी हिंगोली पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी माया वानखडे यांच्या अध्यक्षतेखालील पथकाकडून अकोले तालुक्यातील कळस ग्रामपंचायत ची तपासणी करण्यात आली. या पथकात हिंगोली पंचायत समितीचे विस्तार अधिकारी डी.डी. घुगे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे हिंगोली जिल्हाध्यक्ष तथा दैनिक गांवकरीचे जिल्हा प्रतिनिधी गजानन मगर , सहाय्यक कार्यक्रमाधिकारी मग्रा रोहयो निलेश राठोर यांचा सहभाग आहे.



यावेळी अकोले पंचायत समीतीचे प्रभारी गटविकास अधिकारी रमेश मुठे,विस्तार अधिकारी विजय धाकतोडे,नंदराम पवार आदी उपस्थित होते. कळस ग्रामपंचायतचे कार्यालय, कळस जिल्हा प्राथमिक शाळा, अंगणवाडी, पशुवैद्यकीय दवाखाना, प्राथमिक आरोग्य केंद्र, तलाठी कार्यालय, स्मशानभूमी आदी ठिकाणी भेटी दिल्या. कळसेश्वर देवस्थान चा परिसर पाहून भारावून गेले. प पु सुभाषपूरी महाराज यांनी या देवस्थान चा विकास कुठलीही शासकीय मदत न घेता लोकवर्गणीतून केलेला पाहून आश्चर्य व्यक्त केले. जिल्हा परिषद शाळेतील कॉम्पुटर व विज्ञान लॅब पाहूनही समाधान व्यक्त केले. शाळे चे पटसंख्या बाबद आनंद व्यक्त केला. गावातील ग्रामस्थ पदाधिकारी यांचा एकोपा व सलोखा या बाबद त्यांना आश्चर्य वाटले. गावातील व मंदिर परिसरात असलेली स्वच्छता याचेही कौतुक केले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान (2025-26) हे महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाचे एक महत्त्वाकांक्षी पाऊल आहे, ज्याचा उद्देश ग्रामपंचायती सक्षम करून शाश्वत ग्रामीण विकास साधणे आहे. हे अभियान सुशासन, पाणी व्यवस्थापन, जनसहभाग आणि डिजिटल साक्षरतेवर भर देत असून प्रत्येक गाव समृद्ध झाले तर, राज्यही समृद्ध होईल या उद्देशाने राज्य शासनाने 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान' राबविण्याचा निर्णय घेतला असून हे अभियान १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर याकालावधी पर्यंत राबविल्या गेले आहे. या अभियानात सुशासन युक्त पंचायत, सक्षम पंचायत, जल समृद्ध, स्वच्छ व हरित गाव, मनरेगा अशा विविध घटकांवर त्या त्या ग्रामपंचायतीला गुण मिळणार आहेत.

यावेळी सरपंच राजेंद्र गवांदे, माजी सरपंच तथा सोसायटीचे चेअरमन विनय वाकचौरे, माजी सरपंच तथा जयकीसान दूध संस्थेचे चेअरमन भाऊसाहेब वाकचौरे, पोलीस पाटील देवस्थान चे सचिव गोपीनाथ ढगे, ग्रामपंचायत सदस्य जिजाबा वाकचौरे, दत्तात्रय वाकचौरे, माजी उपसरपंच दिलीप ढगे, माजी ग्रामपंचायत सदस्य रावसाहेब वाकचौरे आदी उपस्थित होते.

## कळसचा दहावीचा निकाल १०० टक्के



अकोले : (स. गांवकरी)

तालुक्यातील कळसेश्वर विद्यालय, कळस चा माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा 100% निकाल लागला आहे. विद्यालयातून विशेष प्राविण्य मध्ये 10 व प्रथम श्रेणीतून 21 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयातून सार्थक गणेश वाकचौरे 85.40 प्रथम, अनुष्का सुनिल आवारी 85.00 द्वितीय, आयुष संजय वाकचौरे 84.80 तृतीय, रोहन बाळासाहेब वाकचौरे 82.80 चतुर्थ, रोशन रावसाहेब वाकचौरे 82.80 चतुर्थ, आयुष नवनाथ वाकचौरे 82.20 पंचम मिळवून उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयातील सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेच्या सेक्रेटरी शैलजा पोखरकर, कार्याध्यक्ष शिरीष नाईकवाडी, सतीश नाईकवाडी, संदीप नाईकवाडी यांनी अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय शिंदे, शिवाजी आवारी, मच्छिंद्र साळुंखे, गीतांजली खरबस, केशव महाले, मनीषा शिंदे, प्रशांत जाधव, प्रतीक्षा घुले ,कुमार पालवे, सुरेश वाघमारे आदींचे मार्गदर्शन लाभले.

# ४७९६ शस्त्र जप्त करून ४३ लाख ४८ हजारांचा मुद्देमाल जप्त

नांदेड जिल्हा : (स. गांवकरी)

अनिल धमने पाटील "नांदेड ग्रामीण पोलिसांची राज्यात सर्वात मोठी शस्त्र साठ्यावर पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर यांची धाडशी कारवाई ४७९६ शस्त्र साठा जप्त करून ४३ लाख ४८ हजारांचा मुद्देमाल केला जप्त करीत दोन जनांवर कारवाई करण्यात आली असून नांदेड ग्रामीण पोलिसांनी बळीरामपूर व गुरु रामदास गुरुनगर वजीराबाद येथे धाड टाकून ४३ लाख ४८ हजार रुपयाचा शस्त्र साठा एकुण ४७४६ तलवारी खंजर यासह शस्त्रसाठा जप्त केला असून दोघां विरुद्ध ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे ग्रामीण पोलिसांनी केलेली कारवाई ही महाराष्ट्र राज्यात सर्वात मोठी कारवाई असल्याची



माहिती पोलिसांनी दिली आहे या झालेल्या कारवाईचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी कौतुक केले असून ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोळकर व पोलीस उपनिरीक्षक व्यंकटेश कुसमे हे दि ६ मे रोजी रात्री ११ वाजून १५ मिनिटांनी बळीरामपूर भागात कॉम्बिन मोहीम राबवीत असताना व गस्त घालताना त्यांना एक जण कमरेला खंजीर व तलवार घेऊन फिरत असल्याचे आढळून आले पोलिसांनी सदरील आरोपीला ताब्यात घेऊन त्यांची विचारपूस केली असता त्यांनी हे आपले नाव अभिजीत गिरिधर सातपुते असे सांगितले पोलिसांनी सदर आरोपीला ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता त्यांनी सदरील हत्यारे अबचलनगर येथील जसवंत सिंग प्रकाश सिंग सुखमणी यांच्याकडून घेतले असल्याचे सांगितले ग्रामीण पोलीसांनी रात्री वजीराबाद पोलिसांना सोबत घेत हवेत शस्त्रसाठा असलेल्या ठिकाणी धाड टाकून 315 मोठ्या तलवारी 315 छोट्या तलवारी क*** रंगाच्या गुप्त्या 25 पांढऱ्या रंगाच्या गुप्त्यात 81 काळ्यापात्याच्या खंजीर 198 हिरव्या मोतीचे खंजीत 275 ग्रे कलर चे खंजीर 116 पांढऱ्या रंगाचे खंजीर 153 पिवळ्या मोठी चे खंजीत 243 इतर छोटे एकत्रित खंजीत 417 छोटे फोल्डिंगचे खंजीर 25 ते 50 कुकरी खंजी 28 फोर फिंगर ग्रुप नक्कल खंजर 28 हातोडे तीन पक्कड व अंबुर तीन प्रत्येकी स्क्रू ड्रायव्हर चार असा 4746 अवैध शस्त्रसाठा जप्त केला असून 43 लाख 48 हजार रुपयांचा मोतीमाल जप केला आहे ग्रामीण पोलीस ठाण्यात आरोपी अभिजीत गिरीधर सातपुते व जसवंत सिंग प्रकाश सिंग सुखमाने यांच्या विरोधात गुन्हा दाखल केले आहे ग्रामीण पोलिसांनी जप्त केलेले 43 लाख 48 हजार रुपये चा हवेत शस्त्रसाठा हा राज्यात सगळ्यात मोठी कारवाई असल्याचे पोलिसांनी सांगितले सदरील घटना समजतात पोलीस अधीक्षक अविनाश कुमार यांनी ग्रामीण पोलीस ठाण्याला भेट देऊन संपर्क संपूर्ण अव्यय शस्त्रसाठ्याची पाहणी केली ग्रामीण पोलीस यांनी केलेल्या कारवाईचे पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी कौतुक केले आहे सदरील कारवाई पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार अप्पर पोलीस अधीक्षक सुरज गुरव उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक ओमकार चिंचोळकर पोलीस उपनिरीक्षक व्यंकटेश कुसमे ज्ञानेश्वर मठवाड व त्यांचे सहकारी वसंत केंद्रीय समीर अहमद शंकर माळगे संतोष पवार चावरे धम्मा कांबळे सिरमलवार रुक्मिणी कानगुले यांनी केली आहे



# टाहाकरी येथील अंबिका मातेच्या मंदिराला गणेश आरोटे यांच्याकडून चांदीच्या आरशीची भेट!

**रविवार, १० मे रोजी महाअभिषेक व पूजाअर्चेचे आयोजन; भाविकांसाठी भोजन व्यवस्थाही!**



**डॉ. विश्वासराव आरोटे**
कळसुबाई शिखरावरून

(स. गांवकरी)

अकोले तालुक्यातील टाहाकरी येथे नदीकाठी वसलेल्या आरोटे परिवाराचे कुलदैवत असलेल्या श्री अंबिका देवी मंदिरात मुंबईस्थित उद्योजक तथा चितळे गावचे भूमिपुत्र गणेश भानुदास आरोटे यांच्या वतीने स्वखर्चातून तयार करण्यात आलेली भव्य आरस चांदीचा मुलामा देऊन मंदिर ट्रस्टकडे रविवार दिनांक १० मे २०२६ रोजी सुपूर्द करण्यात येणार आहे. यानिमित्त मंदिर परिसरात महाअभिषेक, पूजाअर्चा व धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून भाविकांसाठी भोजन व्यवस्थाही करण्यात आली आहे.

महाराष्ट्रभरातील आरोटे परिवाराचे श्रद्धास्थान असलेल्या टाहाकरी येथील अंबिका मातेच्या दर्शनासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविक मोठ्या संख्येने येत असतात. सुमारे सात ते आठ लाख आरोटे परिवाराचे हे कुलदैवत मानले जाते. विशेष म्हणजे पुण्यातील प्रसिद्ध दगडूशेठ हलवाई गणपती संस्थापकांच्या परिवारातील सदस्य देखील अंबिका मातेच्या दर्शनासाठी येथे आवर्जून येत असल्याचे सांगितले जाते.

मुंबई येथे नोकरीनिमित्त वास्तव्यास असलेले गणेश भानुदास आरोटे यांनी आपल्या कुलदैवताविषयी असलेल्या श्रद्धेतून हा उपक्रम हाती घेतला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून मुंबई येथे या आरशीचे काम सुरू होते. आता हे काम अंतिम टप्प्यात आले असून सुमारे सात ते आठ लाख रुपये खर्चून ही आकर्षक आरस तयार करण्यात आली आहे.

उत्सव काळात देवीच्या प्रवेशद्वाराजवळ ही आरस बसविण्यात येणार असून कार्यक्रमानंतर तिचे कायमस्वरूपी फिटिंग करण्यात येणार असल्याची माहिती ट्रस्टच्या वतीने देण्यात आली.

टाहाकरी येथील हे प्राचीन मंदिर पुरातत्व विभागाच्या अखत्यारीत असून स्थानिक ट्रस्टी मंडळाच्या माध्यमातून मंदिराची पूजा-अर्चा व देखभाल केली जाते. धार्मिक परंपरा आणि श्रद्धेची सांगड घालत गणेश आरोटे यांनी केलेल्या या दानकार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.


विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वीच चितळवेढे गावातील वरसुआई मंदिरासाठी देखील गणेश आरोटे यांनी मोठे योगदान दिले होते. आपल्या कमाईतील काही हिस्सा धार्मिक व सामाजिक कार्यासाठी खर्च करण्याची त्यांची भावना अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

अंबिका मातेच्या कृपाछत्राखाली संपूर्ण आरोटे परिवार सुखी, समृद्ध व निरोगी राहावा, या भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आल्याचे गणेश आरोटे यांनी सांगितले. या धार्मिक कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन मंदिर ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

*स्वतःच्या अल्पवयीन मुलीवरील अत्याचार करणाऱ्या*

# आरोपी बापास जन्मठेपेची शिक्षा

**जिल्हा व सत्र न्यायालय जुन्नर यांचा निर्णय**



ओतूर : (स. गांवकरी)

जुन्नर तालुक्यातील ओतूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत दि. १९ डिसेंबर २०२० रोजी दुपारी १ ते २ वाजे दरम्यान ९ वर्षाची मुलगी शाळेच्या मधल्या सुट्टीत जेवण करण्यासाठी घरी आली असता घरात कोणी नसल्याची संधी साधुन तिच्या वडिलांनी घराचा दरवाजा आतून बंद केला व स्वतःच्याच अल्पवयीन मुलीस हाताने मारहाण करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली होती.

सदरचा प्रकार मुलीच्या आईला समजल्यावर दि. १९ डिसेंबर रोजी पिडीत मुलीच्या आईने ओतूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. दिलेल्या तक्रारीवर ओतूर पोलिस स्टेशनला नराधम बापावर गु.र.नं. ४८८/२०२० भा.द.वि.का.क. ३७६ (१) (२) (आय), (जे), ३२३ सह लैंगीक अपराधांपासुन बालकांचे संरक्षण अधिनीयम २०१२ चे कलम ४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदरचा गुन्हा दाखल केल्यानंतर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन तत्कालीन प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक पी. एच. कांबळे यांनी दाखल गुन्हयाचा तपास स्वतःकडे घेवुन आरोपीला अटक केली होती. यातील आरोपीचे विरोधात सबळ पुरावे प्राप्त करून तपासी अधिकारी यांनी परिपुर्ण दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल केले होते. गुन्हयाचे दोषारोपत्र दाखल केल्यानंतर सदरच्या गुन्हयाची सुनावणी एस.बी. शेलार विशेष न्यायाधिश, अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय, जुन्नर यांच्यासमोर झाली असुन आरोपीच्या विरोधात सबळ पुरावे आढळुन आल्याने मा. न्यायालयाने आरोपी राजेश रामदास नवले यास फौजदारी प्रक्रिया संहिताच्या कलम २३५ (२) नुसार लैंगिक अपराधांपासुन बालकांचे संरक्षण अधिनीयम ४ (२) अंतर्गत शिक्षा पात्र गुन्हयासाठी दोषी ठरवले आहे. आरोपी राजेश नवले यास लैंगिक अपराधांपासुन बालकांचे संरक्षण अधिनीयम २०१२ चे कलम ४ अन्वये जन्मठेपेची सक्त शिक्षा आणि १०,००० रूपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. तसेच दंड न भरल्यास ६ महिने तुरूंगवास भोगावा लागेल. त्याचप्रमाणे भादवि क. ३२३ अन्वये शिक्षापात्र गुन्हयासाठी १ वर्षाच्या सक्त कारावासाची आणि १,००० रू. दंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. तसेच दंड न भरल्यास ३ महिन्याची शिक्षा भोगावी लागेल अशा प्रकारची शिक्षा देण्यात आली आहे. मा. संदिपसिंह गिल, पोलीस अधीक्षक साो. पुणे ग्रामीण, मा. रमेश चोपडे, अप्पर पोलीस अधीक्षक सो. पुणे ग्रामीण, मा. गणेश बिरादार, अप्पर पोलीस अधीक्षक सो. बारामती विभाग, मा. धनंजय पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी जुन्नर विभाग जुन्नर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी सहा. पोलिस निरक्षक ज्ञानेश्वर बाजगिरे, जिल्हा कोर्ट पैरवी अधिकारी पोलिस निरीक्षक संतोष घोळवे, कोर्ट पैरवी अधिकारी म.पो.हवा. मनिषा ताम्हाणे, महिला कर्मचारी पुजा औटी यांनी काम केले असुन सदरच्या गुन्हयाचा तपास पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे तसेच पो.हवा. देविदास खेडकर यांनी केला आहे. त्याचप्रमाणे अतिरिक्त सरकारी वकील म्हणुन जी. के. खोडे यांनी काम पाहिले.

# पुण्यात उभारणार 'कलेचे मंदिर'

## व्यंगचित्र महोत्सवात दानशूर ठाणावालांची ग्वाही

पुणे : (स. गांवकरी)

देशभरात देवतांची अनेक मंदिरे उभारली गेली आहेत; आता पुण्यात कलेचे मंदिर उभारण्याची संधी मिळाली असून त्यासाठी तन, मन आणि धनाने प्रयत्न करणार असल्याची ग्वाही दानशूर व्यक्तिमत्त्व डॉ. नानजीभाई ठक्कर ठाणावाला यांनी दिली. युवा संवाद सामाजिक संस्थेतर्फे आयोजित 'पुणे आंतरराष्ट्रीय व्यंगचित्र महोत्सव' (वर्ष तिसरे) च्या दुसऱ्या दिवसाच्या सत्राचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

ठाणावाला म्हणाले, जगभरातील व्यंगचित्रकारांना एकत्र आणून त्यांच्या कलाकृतींचे पुण्यात प्रदर्शन भरविणे ही अत्यंत उल्लेखनीय बाब आहे. व्यंगचित्रकारांनी आपली चित्रे पाठवली म्हणजे ते प्रत्यक्ष या



■ पुणे आंतरराष्ट्रीय व्यंगचित्र महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी रंगला व्यंगचित्रकलेचा उत्सव

महोत्सवात सहभागी झाल्यासारखेच आहे. या प्रदर्शनातून मानवतेचा महान संदेश दिला जात असून ही कला जपण्यासाठी स्वतंत्र व्यासपीठ उभारणे काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी युवा संवाद सामाजिक संस्थेचे अध्यक्ष तथा महोत्सवाचे आयोजक धनराज गरड, कार्टूनिस्ट कंबाईनचे अध्यक्ष गौरव सर्जेराव, उपाध्यक्ष अमित पापळ, समन्वयक किशोर शितोळे, माय माऊली केअर सेंटरचे अध्यक्ष विठ्ठलराव वरुडे पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.महोत्सवाच्या पहिल्या सत्रात व्यंगचित्र अभ्यासक डॉ. प्रविण मस्तुद यांची प्रकट मुलाखत गौरव सर्जेराव आणि धनराज गरड यांनी घेतली. यावेळी मराठी व्यंगचित्रकलेचा प्रवास, तिची सद्यस्थिती आणि समोरील आव्हाने यांवर सखोल चर्चा झाली. दुसऱ्या सत्रात प्रसिद्ध व्यंगचित्रकार निलेश जाधव यांनी प्रत्यक्ष प्रात्यक्षिकातून व्यंगचित्र रेखाटनाची बारकावे उलगडून दाखवले. त्यानंतर ज्येष्ठ व्यंगचित्रकार रवींद्र बाळापूरे यांनीही प्रभावी प्रात्यक्षिक सादर केले.

उपस्थित व्यंगचित्रकारांचा सन्मान डॉ. ठाणावाला यांच्या हस्ते करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक धनराज गरड यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख विठ्ठलराव वरुडे पाटील यांनी करून दिली, तर आभार प्रदर्शन किशोर गरड यांनी केले.

# अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या.,अ.नगर

मुख्य कार्यालय:- महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड,उपनिबंधक, ता.नगर कार्यालयाशेजारी, अ.नगर. ✆:०२४१-२३२६९१४

जा. क्र. पतसंस्था फेडरेशन /२५९/ सन २०२६ दिनांक -०५/०५/२०२६

## स्थावर मालमत्ता जप्ती हुकूम

ज्या अर्थी **विवेकानंद ग्रामिण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या.,जामखेड,ता.जामखेड,जि.अ.नगर** यांनी खाली नमुद केलेल्या थकबाकीदारांविरुध्द महाराष्ट्र सह.संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१/९८ ब अन्वये वसुली दाखले मिळविले असुन त्यांच्यावर रितसर मागणी नोटीस बजावली आहे.तरीही त्यांनी त्यांच्याकडील थकबाकीची रक्कम भरली नसल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७/(१०) नुसार मला मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था अ.नगर यांनी प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरुन मी **एम.ए.शेख** विशेष वसुली व विक्री अधिकारी खालील नमुद स्थावर मालमत्ता थकीत येणे रक्कम वसुलीकरिता जप्त करीत आहे. आणि महाराष्ट्र सहकारीसंस्था अधिनियम १९६० चे कलम ९९ मधील तरतुदीनुसार वसुली दाखला दिल्यानंतर सदर स्थावर मालमत्तेचे कोणतेही खाजगी हस्तांतरण / दुसऱ्याच्या स्वाधीन करण्यात आलेली असेल किंवा विक्री अथवा तिच्यावर कोणताही भार,गहाण,दान देण्यात किंवा बोजा निर्माण करण्यात आला असेल, तर त्या सर्व बाबी पतसंस्थेच्या बाबतीत रद्द / निरर्थक ठरतील.

| अ.नं. | थकबाकीदाराचे नाव | गांव | स्थावर मिळकत: वसुली दा.रक्कम | गट नं./प्लॉट नं./मिळकत नं. | क्षेत्र हे. आर | आकार रु. पै | चतु:सिमा (पुर्व / पश्चिम / दक्षिण / उत्तर) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कर्ज - विकास त्रिंबक पांढरे यांची मिळकत व करिता<br>जामि - दत्तात्रय श्रीराम वारे यांची मिळकत<br>गहाणदार - नितीन त्रिंबक पांढरे यांची मिळकत<br>जामि- सोनाली विकास पांढरे | जामखेड<br>जामखेड<br>जामखेड<br>जामखेड<br>रत्नापुर<br>रत्नापुर<br>रत्नापुर<br>रत्नापुर<br>जामखेड<br>ता.जामखेड | १७७९३८२/- +इतरखर्च+ होणार व्याज | ११४५/१<br>११७१<br>१४८८ पैकी<br>७४० पैकी<br>५१६<br>५१६ पैकी<br>५१६ पैकी<br>६६ पैकी<br>११४५/१ | २.३८.००<br>०.०३.५३<br>०.३०.५५ पैकी<br>०.२७.०० पैकी<br>०.१९.००<br>२.२६.०० पैकी<br>२.२७.०० पैकी<br>४.३२.०० पैकी<br>२.३८.०० | २३.८०<br>-<br>०.१४<br>०.३५<br>०.६६<br>५.७६<br>५.७८<br>२.२८<br>२३.८० | मुळ नकाशा प्रमाणे |
| २ | कर्ज - सुनिल रामभाऊ सुर्वे यांची मिळकत<br>जामि - सुरेश बन्सी पाटील<br>जामि - संतोष कांतीलाल भाळवणकर | खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>ता.जामखेड | २९४०६५/- +इतरखर्च+ होणार व्याज | मा.क्र.९७१/१ब मालमत्तेचं वर्णन २२.५*१८यात विट सिमेंट पत्रे बांधकाम पैकी<br>१३१<br>१३४<br>१३५<br>१३८<br>१४२<br>१४२ | ३७.६३ चौमी.पैकी<br>०.३३<br>०.०८<br>०.०८<br>०.०९<br>१.२१<br>१.२१ | --<br>०.२६<br>०.१५<br>०.१८<br>०.२०<br>०.७०<br>०.७० | मुळ नकाशा प्रमाणे |
| ३. | कर्ज - श्रीनिवास सोनबा खैरे यांची मिळकत व करिता<br>जामि-सुधिर वसंतराव जमकावळे यांची मिळकत<br>जामि-विनोद महावीर वाणी | वाकी<br>खर्डा<br>ता.जामखेड | २९५२०८/- +इतरखर्च+ होणार व्याज | १५२/२<br>२३६/१ पैकी | ०.२१.००<br>१.७८०० पैकी | ०.५१<br>३.०० | मुळ नकाशा प्रमाणे |
| ४. | कर्ज - राजेंद्र मारुती सदाफुले यांची मिळकत व करिता<br>जामि- गोकुळ शाहुराव पाबळ यांची मिळकत<br>जामि- शाहुराव भागुजी पाबळ | जामखेड<br>मोहा<br>ता.जामखेड | २३५४०/- +इतरखर्च+ होणार व्याज | ११८६<br>५५९ | ०.००.८२<br>०.६३ | ०.०१<br>१.११ | मुळ नकाशा प्रमाणे |
| ५. | कर्ज - सुमन विजय जाधव यांची मिळकत व करिता<br>जामि- संदिप रामदास गायकवाड यांची मिळकत<br>जामि- सुरेश रामदास गायकवाड | जामखेड<br>जामखेड<br>जामखेड<br>ता.जामखेड | ७३६९६/- +इतरखर्च+ होणार व्याज | ११८६ पैकी<br>११८६ पैकी<br>११८६/१ | ०.०३ पैकी<br>०.०२ पैकी<br>०.०१.१५ | ०.०३<br>०.०२<br>४.०० | मुळ नकाशा प्रमाणे |
| ६. | कर्ज - बाळु साहेबराव गायकवाड करिता<br>संमतीदार- किसन साहेबराव गायकवाड यांची मिळकत<br>जामि- ओंमकार अशोक तिवाटणे<br>जामि- मुड्डे सचिन शिवचलप्पा | जामखेड<br>जामखेड<br>जामखेड<br>ता.जामखेड | २०३७२०/- +इतरखर्च+ होणार व्याज | ११८४/१ | ०.००.६२ | ०.०१ | मुळ नकाशा प्रमाणे |
| ७. | कर्ज - दादाराम रघुनाथ वाघमारे यांची मिळकत व करिता<br>जामि- दत्तात्रय शंकर गोलेकर यांची मिळकत<br>जामि- विनोद महाविर गोलेकर | खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>ता.जामखेड | ४०७७५/- +इतरखर्च+ होणार व्याज | मा.क्र.६८/ब मालमत्तेचे वर्णन [प.पु ४४*१४द.उ.] पु.प.३५*३.द.उ.आर सी सी १ मजली व खुली जागा १०*३<br>मा.क.६८/ब मालमत्तेचे वर्णन ३५*३.५ यात आर सी सी एक मजली इमारत बांधकाम व १०*३.५ खुली जागा<br>४४३ पैकी<br>८९३ पैकी | चौमी<br>११.३८ चौमी<br>१.०९ पैकी<br>०.०२ पैकी | १.११<br>०.०२ | मुळ नकाशा प्रमाणे |
| ८. | कर्ज - बाळु रघुनाथ भोसले यांची मिळकत व करिता<br>जामि- संभाजी रघुनाथ भोसले यांची मिळकत<br>जामि- नवनाथ रघु भोसले यांची मिळकत | खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>ता.जामखेड | १०३४२६/- +इतरखर्च+ होणार व्याज | मा.क्र.१४/३ मालमत्तेचे वर्णन १६*११.५ यात आर सी सी इमारत बांधकाम<br>४९२<br>६८९<br>५४१ | १७.०९ चौमी<br>०.८१<br>०.०२.७७<br>०.११ | -<br>०.४४<br>०.०३<br>०.११ | मुळ नकाशा प्रमाणे |
| ९. | कर्ज - दिगंबर जनार्धन वाळसकर/वाळुंजकर यांची मिळकत व करिता<br>जामि- दत्तात्रय शंकर गोलेकर यांची मिळकत<br>जामि- दत्तात्रय नारायण पवार | खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>ता.जामखेड | ३०५०१९/- +इतरखर्च+ होणार व्याज | मा.क्र.१०४८ मालततेचे वर्णन २३.५*१९ यात आर सी सी इमारत बांधकाम १९*२१ विट सिमेंट पत्रे बांधकाम<br>मा.क्र.१०४८ मालततेचे वर्णन २३.५*१९ यात आर सी सी इमारत बांधकाम १९*२१ विट सिमेंट पत्रे बांधकाम<br>६१०<br>६१२<br>६२५<br>४४३ पैकी<br>४५० पैकी<br>८९३ पैकी | ३७.०७ चौमी<br>४१.४८ चौमी<br>०.१६<br>०.१३<br>०.१७<br>०.१६<br>०.१३<br>०.१७<br>१.०९ पैकी<br>०.२२ पैकी<br>०.०२ पैकी | -<br>-<br>०.११<br>०.०९<br>०.१८<br>०.११<br>०.०९<br>०.१८<br>१.११<br>०.१६<br>०.०२ | मुळ नकाशा प्रमाणे |
| १० | कर्ज - नवनाथ रघुनाथ भोसले यांची मिळकत व करिता<br>जामि- आसाराम गोवर्धन अंधाळकर यांची मिळकत<br>जामि- संभाजी रघुनाथ भोसले यांची मिळकत | खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>खर्डा<br>जामखेड<br>ता.जामखेड | १७८९७१/- +इतरखर्च+ होणार व्याज | मा.क्र.१४/६ मालमत्तेचे वर्णन १६.५*११.५ यात आर सी सी बांधकाम<br>४४१<br>११४४<br>११४५<br>११४६<br>११७३/२<br>४९२ | १७.६३ चौमी<br>१.०७<br>०.७०<br>०.२८<br>०.४१<br>०.२७<br>०.४०.०० | ०.८९<br>०.७०<br>०.८६<br>१.२०<br>०.९४<br>०.२२ | मुळ नकाशा प्रमाणे |

हा आदेश प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत वसुल पात्र रक्कम व त्यावरील येणे व्याज न भरल्यास वरीलप्रमाणे जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचा जाहिर लिलाव करण्यात येईल व पतसंस्थेस येणे असलेल्या वसुल पात्र रक्कमेचा भरणा केला जाईल. वरील स्थावर जाहिर लिलावाने विक्री करुन ही वसुल पात्र रक्कमेएवढी रक्कम न आल्यास जामिनदारांकडुन वरील प्रमाणेच प्राधान्याने वसुली केली जाईल,याची जामिनदाराने नोंद घ्यावी.

स्थळ :- अ.नगर
दिनांक -०५/०५/२०२६

सिल

सही
(एम.ए.शेख)
विशेष वसुली व विक्री अधिकारी
अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सह. फेडरेशन मर्या,अ.नगर

# उष्माघाताने कोतुळमध्ये एकाचा दुर्दैवी मृत्यू!

**कोतुळ : (स. गांवकरी)**



वाढत्या उष्णतेचा फटका अकोले तालुक्यातील कोतुळ येथे एका व्यक्तीला बसल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. दगडू काळू मेंगाळ (रा. विटे, ता. अकोले, जि. अहिल्यानगर) यांचा उष्माघातामुळे मृत्यू झाल्याची घटना घडली. दगडू मेंगाळ हे गेल्या दहा वर्षांपासून कोतुळ येथे वास्तव्यास असून स्वतःचा टेलरिंग व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. त्यांच्या पश्चात विवाहित मुलगी तसेच दोन मुले असा परिवार आहे. त्यापैकी एक मुलगा बारावीमध्ये शिक्षण घेत असून दुसरा नववीमध्ये शिकत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कोतुळ-अकोले रोडवरील नवीन पुलाजवळ ते आपल्या टीव्हीएस मोटारसायकलवरून बहिणीच्या घरी जात होते. दरम्यान, प्रचंड उन्हाचा त्रास जाणवल्याने त्यांनी रस्त्याच्या कडेला असलेल्या छोट्या झाडाखाली थांबून विश्रांती घेतली. उष्णतेची तीव्रता अधिक असल्याने त्यांनी पाणी पिल्यानंतर खाली बसून आराम करण्याचा प्रयत्न केला. मात्र, अचानक त्यांच्या छातीत दुखू लागल्याने ते तेथेच कोसळले. यावेळी पांगरी येथून येणाऱ्या त्यांच्या पाहुण्यांनी त्यांना पाहून हलविण्याचा प्रयत्न केला, मात्र तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता. त्यानंतर तातडीने ॲम्ब्युलन्सला पाचारण करण्यात आले. मृतदेह पुढील शवविच्छेदनासाठी सरकारी दवाखान्यात हलविण्यात आला. या घटनेमुळे कोतुळ परिसरात हळहळ व्यक्त होत असून नागरिकांनी उष्णतेच्या काळात काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.




**रावेर (स गांवकरी) :** जळगाव जिल्हा हा केळीचा जिल्हा म्हणुन सर्वत्र ओळखला जातो त्यात रावेर , मुक्तताई नगर , यावल , या तालुक्यांमध्ये जास्तीतजास्त केळी उत्पादन घेतले जाते. म्हणून , या ताक्यांची संपूर्ण राज्यभर नव्हेतर देशभरात ओळख आहे . सध्या तपमानाचा पारा ४६ पर्यंत पोहचल्याने , पुन्हा निसर्ग केळीवर कोपल्याचे विदारक अनुभव आमच्या कळीराजाला येत असुन , केळीबागा वाचविण्यासाठी धडपड सुरू आहे. त्यात पाण्याची पातळी खोलवर गेल्याने , पाळीपाळीने पाणी द्यावे लागत आहे.

## थोडक्यात बातम्या...

### चैतन्याची तन्वी पंडोरे शेकडा ९८.८० गुण मिळवून जुन्नर तालुक्यात प्रथम




जुन्नर तालुका **(स. गांवकरी)** : ग्राम विकास मंडळ ओतूर संचलित चैतन्य विद्यालयाचा मार्च २०२६ चा इयत्ता दहावीचा शेकडा निकाल ९६.५१% लागला असून २५८ विद्यार्थ्यां पैकी २४९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.तन्वी सुनील पंडोरे हि शेकडा ९८.८० गुण मिळून जुन्नर तालुक्यात प्रथम आली. तालुक्यात सर्वाधिक ११४ विद्यार्थी विशेष प्राविण्य मिळवून उत्तीर्ण झाले ही विद्यालयाच्या दृष्टीने भूषणावह बाब आहे. शेकडा ९० च्या पुढे गुण २८ विद्यार्थ्यांना मिळाले असून शेकडा ८० ते ९० च्या दरम्यान गुण ६४ विद्यार्थ्यांना मिळाले अशी माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका राजश्री भालेकर यांनी दिली. विद्यालयातील प्रथम पाच विद्यार्थी पुढील प्रमाणे-१)तन्वी सुनील पंडोरे( तालुक्यात प्रथम -९८.८०)२)अनुश्री प्रशांत तांबे (९६.८०)३) सलोनी मनोहर वामन(९६.६०)४) आदित्य नवनाथ बोरुडे(९६.२०) ५) आदिती रविंद्र ढमाले (९६.००) सर्व यशस्वी विद्यार्थी , मार्गदर्शक शिक्षक यांचे ग्राम विकास मंडळ ओतूरचे अध्यक्ष अनिल तांबे,प्रभाकर तांबे,राजेंद्र डुंबरे,रघूनाथ तांबे,प्रदीप गाढवे, पंकज घोलप,राजश्री भालेकर , संजय हिरे,अनिल उकिरडे , अजित डांगे यांनी अभिनंदन केले.ग्रामस्थ व पालक यांच्या कडून विद्यालयाने मिळविलेल्या यशाबद्दल कौतुक होत आहे.

### छ. शिवाजी शिक्षण संस्थेच्या आठ माध्यमिक विद्यालयांचा उत्कृष्ट निकाल

श्रीगोंदा **(स. गांवकरी)** : श्रीगोंदा तालुक्यातील सहकार व शिक्षण महर्षी शिवाजीराव नागवडे बापू यांनी स्थापन केलेल्या श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या आठ माध्यमिक विद्यालयांनी मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या एसएससी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शुक्रवारी (दि. ८ मे) जाहीर झालेल्या निकालात संस्थेच्या तीन विद्यालयांनी शंभर टक्के निकालाची परंपरा कायम राखली. संस्थेअंतर्गत श्रीगोंदा फॅक्टरी येथील इंदिरा गांधी विद्या निकेतन, पिंपळगाव पिसा येथील पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय तसेच टाकळी कडेवळीत येथील लाल बहादूर शास्त्री विद्यालय यांनी १०० टक्के निकालाची नोंद केली. याशिवाय इतर विद्यालयांचे निकाल पुढीलप्रमाणे जाहीर झाले आहेत : श्री व्यंकनाथ विद्यालय, लोणी व्यंकनाथ – ९७.८७% डॉ. राजेंद्र प्रसाद विद्यालय, पारगाव सुद्रिक – ९५.८३% वसंतदादा पाटील विद्यालय, पिंपरी कोलंदर – ९५.६५% श्री हंगेश्वर विद्यालय, हंगेवाडी – ९४.७३% श्री छत्रपती संभाजी विद्यालय, पेडगाव – ८९.३६% संस्थेच्या सर्व विद्यालयांनी यंदाही उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखत गुणवत्तापूर्ण शिक्षणाची छाप उमटवली आहे. या यशाबद्दल सहकार महर्षी नागवडे कारखान्याचे अध्यक्ष तथा छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेंद्रदादा नागवडे, जिल्हा बँकेच्या संचालिका सौ. अनुराधा नागवडे, संस्थेच्या उपाध्यक्षा सौ. मेघाताई औटी, संस्थेचे सर्व विश्वस्त मंडळ, संस्थेचे निरीक्षक सचिनराव लगड तसेच ज्ञानदीप ग्रामीण विकास शिक्षण संस्थेचे निरीक्षक बी. के. लगड यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




### विदर्भ बीज संवर्धक कार्यक्रमात वसुंधरा अकॅडेमीचा रुशांक नवलेचा सहभाग

अकोले **(स. गांवकरी)** : महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ आणि महाराष्ट्र जनुक कोष प्रकल्प तसेच BAIF डेव्हलपमेंट रिसर्च फाउंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर येथे विदर्भ बीज संवर्धक कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यशाळेमध्ये विदर्भातील सुमारे ६० बीज संवर्धकांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमात अकोले तालुक्यातील बीज संवर्धक तसेच भारत सरकारच्या 'सीड जिनोम सेवियर' पुरस्काराने सन्मानित श्रीमती. ममताबाई भांगरे आणि BAIF चे जैवविविधता विभागाचे सह जिल्हा कार्यक्रम अधिकारी श्री. योगेश नवले यांनीही मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत वसुंधरा अकॅडमी, अकोले येथील इयत्ता सहावीतील विद्यार्थी रुशांक योगेश नवले यांनी देखील सहभाग नोंदवला. लहान वयातच जैवविविधतेबाबतची जाण आणि अभ्यासू वृत्ती दाखवत रुशांकने चर्चेमध्ये सक्रिय सहभाग घेतला. आपल्या गावातील आणि परिसरातील जैवविविधतेविषयी त्याने आत्मविश्वासाने मते मांडली. कार्यशाळेदरम्यान पीक वाण विविधता, रानभाज्या, तसेच स्थानिक पशुधन यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सखोल चर्चा करण्यात आली. या चर्चेमध्ये रुशांकने उत्साहाने सहभाग घेत उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. लहान वयातच जैवविविधतेबाबत जागरूकता निर्माण करून सक्रिय सहभाग घेणारा रुशांक नवले हा भविष्यातील पर्यावरण संवर्धनाचा आशादायक प्रतिनिधी ठरत असल्याची भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली. त्याच्या या यशस्वी सहभागाबद्दल अभिनव शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. मधुकरराव नवले, कोषाध्यक्ष तथा प्राचार्य डॉ. जयश्री देशमुख, सचिव विक्रम नवले, सहसचिव प्राचार्य अल्फोन्सा डी. , उपप्राचार्य राधिका नवले, संचालक मंडळ सर्व विभागांचे प्राचार्य व सर्व शिक्षक वृंद यांनी कौतुक केले.

# लोखंडी रॉड व कोयत्याच्या हल्ल्यात एक जण गंभीर

**चौघांवर गुन्हा दाखल**

**जामखेड : (स. गांवकरी)**



मागिल भांडणाच्या कारणावरून अंगणात झोपलेल्या एकावर चार जणांनी लोखंडी रॉड व कोयत्याने हल्ला करत गंभीर जखमी केले. या प्रकरणी जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

फिर्यादी यांचा मुलगा ओम याचे ऑगस्ट २०२५ मध्ये नान्नज या ठिकाणी साळवे कुटुंबाशी भांडण झाले होते. भांडणामुळे ओम व फिर्यादीचे जावई व इतर नातेवाईक हे सध्या जामखेड कारागृहात आहेत. फीर्यादी चंद्रकांत कल्याण गोरे, वय ५० वर्षे रा. हाळवस्ती, नान्नज हे सोमवारी रात्री साडेदहा वाजता आपल्या घरातील अंगणात झोपले होते. यावेळी त्या ठिकाणी आरोपी यशदीप साळवे, (पुर्ण नाव माहित नाही) सतिष साळवे, (पुर्ण नाव माहित नाही) बाबा शेख, (पुर्ण नाव माहित नाही व सद्दाम पठाण (पुर्ण नाव माहित नाही) चौघे रा. नान्नज हे मध्यरात्री १ ते १:३० वाजण्याच्या सुमारास त्या ठिकाणी आले. व फीर्यादी गोरे यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. यानंतर आरोपी यशदिप साळवे याने त्याच्या हातातील कोयत्याने फीर्यादी यांच्या कपाळावर वार केला. फीर्यादी हे उठण्याचा प्रयत्न करत असतानाच यातील बाबा शेख, सतिष साळवे व सद्दाम पठाण यांनी लोखंडी रॉडने त्यांच्यावर हल्ला केला. या घटनेत फीर्यादी चंद्रकांत गोरे हे गंभीर जखमी झाले. तसेच जाताना म्हणाले की सुनिल भाऊंनी सांगितलेले काम झाले आता हा १५ ते २० मिनीटात मरुन जाईल असे देखील फीर्यादी यांनी ऐकले होते. यानंतर सर्वजण काळ्या रंगाच्या स्कॉर्पीओ गाडीने घटनास्थळाहुन पळुन गेले. यानंतर जखमी फीर्यादी गोरे यांच्या ओरडण्याच्या आवाजाने शेजारी जागे झाले. त्यांना तातडीने जामखेड येथिल हॉस्पिटल मध्ये प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथिल खाजगी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे.

याबाबत फीर्यादी चंद्रकांत गोरे यांनी शुक्रवार दि ८ मे रोजी दिलेल्या फिर्यादीवरुन वरील चारही आरोपींन विरोधात जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सपोनि वर्षा जाधव या करत आहेत.

# आमदार धिरज लिंगाडे यांच्या पाठपुराव्याला यश!

**बुलढाणा : (स. गांवकरी)**

- कर्मचाऱ्यांना शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के रक्कम पेन्शन म्हणून मिळणार!

राज्य सरकारी कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या निवृत्तीवेतनासंदर्भात राज्य शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेत सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना लागू केली आहे. या नव्या निर्णयानुसार कर्मचाऱ्यांना शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के रक्कम निवृत्तीवेतन म्हणून मिळणार असून महागाई भत्त्याचाही लाभ देण्यात येणार आहे. या निर्णयासाठी अमरावती पदवीधर मतदारसंघाचे आमदार धिरज लिंगाडे यांनी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा केला होता. राज्य शासनाने बुधवारी या योजनेचे स्वरूप जाहीर केले. २००५ नंतर सेवेत आलेल्या कर्मचाऱ्यांसाठी ही योजना लागू करण्यात आली असून ती १ मार्च २०२४ पासून पूर्वलक्षी प्रभावाने अमलात आणण्यात येणार आहे. पात्र कर्मचाऱ्यांना ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत या योजनेत सहभागी होण्यासाठी पर्याय निवडण्याची संधी देण्यात आली आहे. या योजनेमुळे राज्यातील लाखो कर्मचाऱ्यांना सामाजिक आणि आर्थिक सुरक्षिततेचा मोठा आधार मिळणार आहे. २० वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक सेवा पूर्ण केलेल्या कर्मचाऱ्यांना शेवटच्या वेतनाच्या ५० टक्के इतके निवृत्तीवेतन देण्यात येणार आहे. तसेच राज्य सरकारी कर्मचाऱ्यांसह अनुदानित शैक्षणिक संस्था, कृषी विद्यापीठे, संलग्न महाविद्यालये आणि जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांनाही या योजनेचा लाभ मिळणार आहे.

# दोन दुचाकींचा अपघात दोघांचा मृत्यु दोघे गंभीर जखमी





**अर्धापूर : (स. गांवकरी)**

दि.७ मे गुरूवार रोजी रात्री ११ वाजताच्या दरम्यान दोन दुचाकींचा अपघात झाला यात दोघांचा मृत्यु तर दोघेजण गंभीर जखमी झाले आहेत.दि.७ गुरूवारी रोजी रात्री ११- वाजता घटनाझाली आहे. तामसा ते अर्धापूर रोडवरील लोणी गावाच्या पाटीवरील पुलावर घडली आहे. अजिंक्य देविदास चाटसे (वय २५ वर्षे) रा.लोणी ता.अर्धापूर हा आपल्या मित्राच्या लग्नावरून तामसा येथून घराकडे येत असतांना अभिषेक विश्वांभर नागठाणे (वय २५ वर्ष) रा.तामसा ता.हादगाव हा तरुण अर्धापूर हून तामसा कडे जात असतानां दोन दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक झाल्याने या अपघातातील जखमिंना रूग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी अजिंक्य देविदास चाटसे (वय २५ वर्षे) रा.लोण ता.अर्धापूर तसेच अभिषेक विश्वांभर नागठाणे (वय २५ वर्ष) रा.तामसा ता.हादगाव यांना मृत घोषीत केले. तर त्यांच्या सोबत असलेले अन्य दोघे गंभिर जखमी आहेत. या अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी नरेंद्राचार्य संस्थान रूग्णवाहीका चालक राजु पाचंगे, १०८ रूग्णवाहीकाचे डॉ.आनंद शिंदे,चालक मारोती गिरी उपस्थित नागरिकांच्या मदतीने जखमींना उपचारासाठी रूग्णांना दाखल केले. सदर रस्त्याचे काम निकृष्ट झाल्याने व अनेक ठिकाणी रस्ता ओबडधोबड खालीवर असल्याने अपघाताचे प्रमाण वाढले असुन यावर उपाययोजना कराव्यात अशी मागणी प्रवाशी वर्गातुन होत आहे.

# एक कोटी रुपयांच्या श्री लक्ष्मीनारायण मंदिराच्या उभारणीचा कोनशिला समारंभ उत्साहात संपन्न!

**पाली (ता. सुधागड, जि. रायगड) : (स. गांवकरी)**



श्री गुजराती समाज पाली व श्री लक्ष्मीनारायण मंदिर ट्रस्ट यांच्या वतीने सुमारे एक कोटी रुपये खर्चून उभारण्यात येणाऱ्या भव्य श्री लक्ष्मीनारायण मंदिराचा कोनशिला समारंभ बुधवार दिनांक ७ मे २०२६ रोजी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला.

हा समारंभ 'समाजभूषण' श्री नानजीभाई खिमजीभाई ठक्कर (ठाणेवाला) तसेच श्री अशोकभाई मेहता (पाली) यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. यावेळी पालीचे नगराध्यक्ष श्री पराग मेहता, श्री राजेश मापारा, श्री रामजीभाई भानुशाली, श्री कल्पेशभाई शहा, श्री हिमांशू शहा, श्री संतोष बुटाला, श्री राजेशभाई तसेच सौ. भावना शहा, सौ. वैशाली मापारा, सौ. वैशाली मेहता, सौ. यामिनी दोशी, सौ. मिताली मेहता आदी मान्यवर उपस्थित होते.

**नानजीभाई ठक्कर यांची प्रमुख उपस्थिती!**

समारंभात मार्गदर्शन करताना श्री नानजीभाई ठक्कर यांनी शिक्षण, व्यसनमुक्ती आणि सामाजिक संस्कृती यांचे महत्त्व अधोरेखित केले. "मुलांना उत्तम शिक्षण देणे ही काळाची गरज आहे. घरामध्ये कोणत्याही प्रकारच्या व्यसनाला थारा देऊ नये. मुलांनी आई-वडिलांची सेवा करावी," असे ते म्हणाले. तसेच "घरातील स्त्री ही साक्षात लक्ष्मीचे रूप असते, त्यामुळे प्रत्येकाने महिलांचा सन्मान राखला पाहिजे," असे सांगत त्यांनी मंदिर उभारणीसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी श्री अशोकभाई मेहता यांनी सांगितले की, यापूर्वी पाली येथील 'गुजराती भवन'चे उद्घाटन देखील श्री नानजीभाई यांच्या हस्ते झाले होते आणि त्या वेळीही आर्थिक अडचणी निर्माण झाल्या नव्हत्या. मंदिराच्या बांधकाम कार्यातही कोणताही अडथळा येणार नसल्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. भूमिपूजनाचा मान श्री नानजीभाई ठक्कर यांच्या हस्ते पार पडणे ही संपूर्ण संस्थेसाठी अभिमानाची बाब असल्याचे उपस्थितांनी नमूद केले. यावेळी त्यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ आणि लक्ष्मी-नारायण यांच्या प्रतिमेने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी श्री कल्पेशभाईंनी श्री नानजीभाईंप्रती कृतज्ञता व्यक्त करत कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

धार्मिक आणि भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या भव्य कोनशिला समारंभाने पाली परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

# ८० लाखांचा मुद्देमाल आ. सोनवणे यांच्या हस्ते परत

**खोडद : (स. गांवकरी)**



जुन्नर तालुक्यातील जुन्नर व ओतूर शहरात घरफोड्या करणाऱ्या सराईत गुन्हेगारांना पोलिसांनी अटक करून त्यांच्याकडून हस्तगत केलेला 80 लाखांचा मुद्देमाल जुन्नरचे आमदार शरद सोनवणे यांच्या हस्ते मूळ मालकाला केला परत. जुन्नर शहरातील भरवस्तीत घराचे कुलूप तोडून सोन्या चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरून नेणाऱ्या आरोपींना जुन्नर पोलिसांनी अटक केली व त्यांच्याकडून 45 लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करून मूळ मालकाच्या ताब्यात देण्यात आला.तसेच डिंगोरे गावातील दत्तवाडी येथे घरफोडी करून जबरी मारहाण करत रोख रक्कम व मोबाईल चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारांना ओतूर पोलीस स्टेशनने ताब्यात घेऊन अटक केली आहे. जुन्नर शहरात मागील जुलै 2025 व ऑक्टोबर 2025 या चार महिन्यांच्या कालावधीत बंद घराचे कुलूप तोडून सोने चांदी व रोख रक्कम असा 45 लाख रुपयांचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरून नेला होता. या प्रकरणी आशिम अस्लम शेख (रा. चांदीपुरा पेठ, जुन्नर ) यांनी जुन्नर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला होता. त्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक किरण अवचर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संदीप मोरे आणि पोलीस अंमलदार विजय जंगम यांनी तपास सुरु केला असता तपासादरम्यान आयन नुदिन वसीम शेख आणि आबान नुदिन मुझीन नुदिन शेख (दोघे रा. शिपाई मोहल्ला, जुन्नर ) हे आरोपी असल्याचे आढळून आले. त्यानंतर जुन्नर पोलिसांनी त्या दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडून 25 लाख रुपयांचे सोने चांदीचे दागिने आणि 10 लाख रुपयांची रोख रक्कम जप्त केली.

त्यानंतर जुन्नर न्यायालयाच्या आदेशानुसार आमदार शरद सोनवणे,पोलीस उपअधीक्षक धनंजय पाटील, तहसीलदार बाळासाहेब शिरसाठ, पंचायत समिती सभापती कमल शेळकंदे, उपसभापती अमित ढोले यांनी ही रक्कम मूळ मालकाच्या ताब्यात सुपूर्द करण्यात आली.

# पठार भागावर क्रांती घडवणार

**खोडद : (स. गांवकरी)**



जुन्नर तालुक्यातील आणे येथे श्री रंगदास स्वामी महाराज मंदिराच्या सभागृहात पठार भागातील गावांमध्ये जलसंधारण कामासंदर्भात कार्यशाळा संपन्न झाली.यावेळी या जलसंधारण कामासंदर्भात डॉ. पुरुषोत्तम वायाळ बोलताना म्हणाले की, जुन्नर तालुक्याच्या पूर्व भागातील आणे पठार, पेमदरा, नळवणे, शिंदेवाडी, आनंदवाडी, व्हरुंडी ही गावे दुष्काळग्रस्त भाग म्हणून ओळखली जातात. या भागात जलतारा प्रकल्पांतर्गत विशिष्ट अंतरावर शास्रोक्त पद्धतीने खड्डे घेतलास हे पाणी जमिनीत खोलवर मुरण्यास मदत होते.हे तंत्रज्ञान अत्यंत कमी खर्चाचे असून यामुळे विहिरी आणि कुपनलिकांच्या पाणी पातळीत वाढ होते. जलसंधारण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्यक्ष शेतकऱ्यांनी आपल्या शेतात सर्वेक्षण केलेल्या ठिकाणी जलतारा खड्डे घ्यावेत, असे आवाहन त्यांनी केले.

तसेच वायाळ पुढे म्हणाले, येणाऱ्या पावसाळ्याच्या आधी हे अभियान लोकसहभागातून करण्याचे नियोजन असून या उपक्रमामुळे पठार भागातील पाणीटंचाई कायमस्वरूपी दूर होण्यास मोठी मदत होणार आहे. यावेळी न्यू स्टार्ट फाउंडेशन पुणे चे डॉ.अमोल आहेर,आर्ट ऑफ लिव्हिंग चे ओंकार आल्हाट,सुरेश पंदारे, माजी सैनिक भास्कर डोंगरे, दिनकर आहेर, सरपंच प्रियांका दाते, बाबाजी दाते, रोहित गटकळ व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)